सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# मुंबईचा सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम, १९२०

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

# THE BOMBAY PUBLIC CONVEYANCES ACT, 1920

**(As modified upto 26th January, 2016)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

[ किंमत : २७ रुपये ]

वि (जे) ६६७

# The Bombay Public Conveyances Act, 1920

# (BOMBAY VII OF 1920)

## मुंबईचा सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम, १९२०

### अनुक्रमणिका


| उद्देशिका. | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| कलमे. | | | क्रमांक |
| १. | संक्षिप्त नाव व व्याप्ती. | ... | २ |
| २. | व्याख्या. | ... | २ |
| | **सार्वजनिक वाहनांना लायसन देणे** | | |
| ३. | सार्वजनिक वाहनांना लायसने दिली पाहिजेत. | ... | ३ |
| ४. | सार्वजनिक वाहनांसाठी लायसन. | ... | ३ |
| ५. | ज्या कारणांवरून लायसन नाकारता येईल किंवा रद्द करता येईल ती कारणे. | | ४ |
| ५-क. | विवक्षित क्षेत्रांमध्ये सायकल-रिक्षांच्या संबंधात लायसन देण्यासंबंधी विशेष तरतुदी. | ... | ५ |
| ६. | वाहनांवर क्रमांक, वगैरे लिहिणे. | ... | ६ |
| ७. | सार्वजनिक वाहनांच्या लायसनबद्दल फी. | ... | ६ |
| | **घोड्यांचे लायसन** | | |
| ८. | घोड्यांचे लायसन. | ... | ६ |
| ९. | घोड्यांना डाग देणे. | ... | ७ |
| १०. | ज्या कारणावरून घोड्यासाठी लायसन नाकारण्यात किंवा रद्द करण्यात येईल ती कारणे आणि पशुवैद्यकीय व्यवसायीकडून त्याची तपासणी. | | ७ |
| | **ड्रायव्हरांना लायसन देणे** | | |
| ११. | ड्रायव्हरांना लायसन देणे. | ... | ७ |
| १२. | ज्या कारणांवरून ड्रायव्हरचे लायसन नाकारण्यात किंवा रद्द करण्यात येईल ती कारणे. | ... | ८ |
| १३. | ड्रायव्हरांचे बिल्ले. | ... | ८ |
| १४. | ड्रायव्हरांच्या लायसनबद्दल फी. | ... | ८ |
| | **लायसन संबंधीच्या तरतुदी** | | |
| १५. | लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात येईल तेव्हा ते परत करणे. | ... | ९ |
| १६. | लायसनदाराचा पत्ता बदलला असल्यास त्याबद्दलची माहिती देणे. | ... | ९ |
| १६-क. | लायसनदाराने, त्याच्या गैरहजेरीत वाहन ज्याच्या ताब्यात दिले असेल त्या व्यक्तीचे नाव कळविणे. | ... | ९ |
| १७. | सार्वजनिक वाहन किंवा घोडा, जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा तपासणीसाठी हजर करणे. | ... | ९ |

## अनुक्रमणिका—चालू

### भाडी व वाहनतळ


| | | | |
|---|---|---|---|
| १८. | भाड्याचे दर. | ... | १० |
| १९. | वाहनतळ. | ... | १० |
| २०. | ड्रायव्हरजवळ ड्रायव्हर म्हणून त्याचे लायसन व भाड्याची यादी असणे. | ... | १० |
| २१. | भाड्याचे पुस्तक देणे. | ... | १० |


### अपराध व शास्ती


| | | | |
|---|---|---|---|
| २२. | लायसनशिवाय सार्वजनिक वाहन ठेवणे. | ... | १० |
| २३. | पोलिसाने फर्माविले असता सार्वजनिक वाहन चालविण्यात कसूर करणे. | ... | ११ |
| २४. | सार्वजनिक वाहनाच्या लायसनदाराने लायसन धारण न करणाऱ्या व्यक्तीस वाहन वापरण्यास देणे किंवा लायसन न दिलेल्या घोड्याकडून ते ओढले जाण्यास परवानगी देणे याबाबत. | ... | ११ |
| २५. | सार्वजनिक वाहन किंवा घोडा तपासणीसाठी हजर करण्यात कसूर करणे. | ... | ११ |
| २६. | सार्वजनिक वाहनांच्या ड्रायव्हर्सचे अपराध. | ... | १२ |
| २७. | लायसन परत करण्यात किंवा पत्ता कळविण्यात कसूर करणे. | ... | १३ |
| २८. | सार्वजनिक वाहनास नुकसान पोहचविणे. | ... | १३ |
| २९. | नुकसान करणाऱ्या ड्रायव्हरने नुकसानभरपाई देणे. | ... | १४ |


### कार्यपद्धती


| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | पोलिसानी धरणे. | ... | १४ |
| ३१. | विवादाच्या बाबतीतील कार्यपद्धती. | ... | १४ |
| ३२. | लायसनदाराने ड्रायव्हरला हजर करणे. | ... | १५ |
| ३३. | भाडे देण्यास नकार देणे. | ... | १५ |


### संकीर्ण


| | | | |
|---|---|---|---|
| ३४. | मालमत्तेची व्यवस्था ; शास्ती. | ... | १५ |
| ३५. | नियम. | ... | १६ |
| ३६. | अधिनियमाची व्याप्ती. | ... | १६ |
| ३७. | भाड्यासाठी घेऊन चालविण्याच्या कारणासाठी ज्या वाहनांचा उपयोग करण्यात येत नाही अशा वाहनास विवक्षित तरतूद लागू करण्याचा अधिकार. | ... | १७ |
| ३८. | वेळोवेळी अधिकार अंमलात आणणे. | ... | १८ |
| ३९. | निरसन व व्यावृत्ती. | ... | १८ |

## सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७[१]

### [ मुंबईचा सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम, १९२० ]*

### [ गव्हर्नर जनरल यांची अनुमती मिळाल्यानंतर, मुंबई शासन राजपत्र यामध्ये दिनांक १७ जून १९२० रोजी अनुमती प्रथम प्रसिद्ध करण्यात आली. ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९२४ चा मुंबई अधिनियम २.

सन १९२४ चा मुंबई अधिनियम ११.

सन १९२८ चा मुंबई अधिनियम ७.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश :--

सन १९४३ चा मुंबई अधिनियम १८ ;†

सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७ ;§

सन १९४८ चा मुंबई अधिनियम १८ ;

सन १९४९ चा मुंबई अधिनियम ३७.

विधि अनुकूलन आदेश, १९५०--

सन १९५० चा मुंबई अधिनियम २८ ;

सन १९५१ चा मुंबई अधिनियम ९.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ८ ;

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ८६ ;

सन १९५९ चा मुंबई अधिनियम ५६.

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम १३ (१ एप्रिल १९७९)**

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम २४ (२२ ऑगस्ट २०१२)

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता मुंबई शासन राजपत्र, १९१९, भाग पाच, पृष्ठ क्रमांक ९४५ पहा, प्रवर समितीच्या अहवालासाठी सन १९२० च्या वरील राजपत्राचा भाग पाच, पृष्ठ क्रमांक ५१ पहा ; आणि विधानसभेतील कामकाजाकरिता सन १९१९ च्या वरील राजपत्राचा भाग पाच, पृष्ठ क्रमांक १०९२, सन १९२० च्या वरील राजपत्राचे पृष्ठ क्रमांक २६५ पहा.

* मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२० याची कलमे १, ३६, ३८ व ३९ ही या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हती त्या भागास ती लागू होतील. (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८६, कलम २ पहा).

† सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २ द्वारे हा अधिनियम निरसित करण्यात आला आणि त्याचे कलम २ नव्याने अधिनियमित करण्यात आले.

§ हा अधिनियम नव्याने अधिनियमित करण्यात आला व उक्त अधिनियमात कलम ९ व अनुसूची इ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणा सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ अन्वये नेहमीकरिता अंमलात असणे चालू राहील.

** ही खूण अधिनियमाच्या प्रारंभीचा दिनांक दर्शविते.

[१][ **ज्याअर्थी,** सार्वजनिक वाहनांच्या नियमनासंबंधी असलेल्या विधीत सुधारणा करणे इष्ट आहे ; आणि **ज्याअर्थी,** विवक्षित वर्गांची वाहने सार्वजनिक वाहने म्हणून चालविण्यास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ;]

**त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व व्याप्ती.

१. (१) या अधिनियमास [२][ महाराष्ट्र सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम ] असे म्हणावे.

(२) हे कलम व कलमे ३६, ३८ व ३९ ही [३][ सबंध ] [४][ मुंबई राज्यास ] लागू आहेत व अधिनियमाचा बाकी भाग, कलम ३६ च्या तरतुदींना अधीन राहून, केवळ [५][ बृहन्मुंबईस ] लागू असेल :

[६][ परंतु, मुंबई सार्वजनिक वाहने (एकीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभानंतर, त्याच्या अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी भाड्याच्या गाड्यांबाबत अधिनियम, १८७९, किंवा हैद्राबाद सार्वजनिक वाहने अधिनियम, १९५६ किंवा सौराष्ट्र प्रदेशासाठी अनुकूलन व लागू केलेला मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२० किंवा कच्छ प्रदेशास लागू केलेला मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२०, मुंबई राज्याच्या ज्या प्रदेशात अंमलात होता त्या प्रदेशांत, उरलेला अधिनियम ताबडतोब अंमलात येईल.]

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ८६.
सन १८७९ चा अधिनियम १४.
सन १९५६ चा हैद्राबाद अधिनियम ३९.
सन १९२० चा मुंबई अधिनियम ७.
सन १९२० चा मुंबई अधिनियम ७.

व्याख्या.

२. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात--

[७][ (क) “ पोलीस आयुक्त ” याचा अर्थ,--

(एक) बृहन्मुंबईसाठी असलेला पोलीस आयुक्त, आणि

---

१. ही उद्देशिका, सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम ६ अन्वये मूळ उद्देशिकेऐवजी दाखल करण्यात आली.

२. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ द्वारे अनुसूची २ व ३, नोंद १४, दिनांक १ मे १९६० पासून “ मुंबई सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम, १९२० ” या ऐवजी त्याच्या संक्षिप्त नावात ही सुधारणा केली.

३. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८६, कलम ३ (एक) (अ) अन्वये “ दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश खेरीजकरून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. महाराष्ट्र विधि अनुकूलन आदेश (राज्य समवर्ती विषय) १९६० द्वारे “ मुंबई राज्य ” या मजकुराऐवजी “ महाराष्ट्र राज्य ” हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९ व सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २, परंतुक अनुसूची इ अन्वये “ मुंबई शहर ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८६, कलम ३ (एक) (ब) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

७. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६, कलम ३, अनुसूची अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (क) दाखल करण्यात आला.

(दोन) उर्वरित अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग इतर कोणत्याही क्षेत्रास लागू करण्यात आला असेल आणि त्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्त यांची नेमणूक करण्यात आली असेल त्या बाबतीत, उक्त क्षेत्रासाठी असलेला पोलीस आयुक्त, असा आहे ;

आणि त्यात संबंधित पोलीस आयुक्त, या अधिनियमान्वये त्याजवर लादण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, किंवा त्यास दिलेले अधिकार वापरण्यासाठी त्याने ज्या कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत केले असेल त्या व्यक्तीचा समावेश होतो ;]

[१][ (ख) " सार्वजनिक वाहन " याचा अर्थ, रस्त्यावर ओढले जाणारे किंवा चालणारे कोणतेही चाक असलेले व व्यक्ती किंवा माल वाहून नेण्यासाठी भाड्याने चालविण्याच्या इराद्याने ज्याचा उपयोग केला जातो असे कोणतेही वाहन, असा आहे ; परंतु, त्यामध्ये मुंबई मोटार वाहन
१९३९ चा ४. अधिनियम, १९३९ मध्ये व्याख्या केलेल्या मोटार वाहनाचा किंवा बसविलेल्या रूळांवरून धावणाऱ्या वाहनांचा समावेश होत नाही ;]

[२][ (ग) " लायसनचे वर्ष " याचा अर्थ, या अधिनियमान्वये मंजूर केलेल्या लायसनच्या कारणासाठी आगाऊ प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, पोलीस आयुक्त जो दिनांक निश्चित करील त्या दिनांकापासून सुरू होणारे वर्ष, असा आहे ;]

(घ) " ड्रायव्हर " या संज्ञेत कंडक्टर, सेवक किंवा सार्वजनिक वाहन ज्याच्या अधिकाराखाली असेल अशी इतर व्यक्ती यांचा समावेश होतो ;

(ङ) " लायसनदार " याचा अर्थ, सार्वजनिक वाहन किंवा घोडा किंवा सार्वजनिक वाहनाचा ड्रायव्हर यासाठी या अधिनियमान्वये मंजूर केलेला लायसन धारण करणारा, असा आहे.

## सार्वजनिक वाहनांना लायसन देणे

सार्वजनिक वाहनांना लायसने दिली पाहिजेत.

३. (१) कोणत्याही व्यक्तीने, याबाबतीत पोलीस आयुक्ताने मंजूर केलेले लायसन असल्याशिवाय कोणतेही सार्वजनिक वाहन भाड्याने देण्यासाठी ठेवता कामा नये किंवा भाड्याने देता कामा नये.

(२) प्रत्येक सार्वजनिक वाहनावर--

(क) त्यासाठी मंजूर केलेल्या लायसनमध्ये वाहनाच्या ज्या क्रमांकाची नोंद केली असेल तो क्रमांक, आणि

(ख) जर उतारू नेण्यासाठी वाहनास लायसन दिलेले असेल तर जेवढे उतारू नेण्याबद्दल त्यास लायसन दिलेले असेल ती संख्या ;

पोलीस आयुक्त निदेश देईल अशा रीतीने स्पष्टपणे लिहिण्यात आली पाहिजे.

सार्वजनिक वाहनांसाठी लायसन.

४. (१) अशी लायसने, ती या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये लवकर संपत नसतील तर, लायसनच्या वर्ष अखेरपर्यंत अंमलात राहतील व ती नव्याने करून घेता येतील.

---

१. सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम २, तसेच सन १९४८ चा अधिनियम क्रमांक १९, कलम २ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड (ख) दाखल करण्यात आला.

२. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.

(२) अशा लायसनमध्ये पुढील तपशील व पोलीस आयुक्त विहित करील असा इतर तपशील व शर्ती असतील :--

(क) लायसनदाराचे संपूर्ण नाव व पत्ता ;

(ख) ज्या दिनांकास लायसन मंजूर करण्यात आले तो दिनांक आणि ज्या दिनांकास त्याची मुदत संपेल तो दिनांक ;

(ग) ज्या स्थानिक क्षेत्रासाठी लायसन मंजूर करण्यात आले असेल ते स्थानिक क्षेत्र ;

(घ) वाहनांचा क्रमांक व वर्ग ;

(ङ) ज्या घोड्यांनी किंवा इतर जनावरांनी (जर असल्यास) ते ओढण्यात येणार असेल त्यांची संख्या ;

(च) वाहनामधून जेवढे उतारू वाहून नेण्याचा अधिकार असेल त्यांची संख्या.

(३) लायसनदाराने अशी लायसने, पोलीस आयुक्तांच्या मंजुरीवाचून, इतर कोणत्याही व्यक्तीस हस्तांतरित करता कामा नये आणि अशा मंजुरीवाचून हस्तांतरित करण्यात आली तर, ती त्यानंतर निरर्थक होतील. अशी मंजुरी जेव्हा देण्यात येईल, तेव्हा ती लायसनवर लिहिली पाहिजे.

[१][ (४) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना केलेल्या स्थानिक प्राधिकारणास उक्त सार्वजनिक वाहनाच्या संबंधात देणे असलेला वाहन-कर अर्जदाराने भरला आहे अशी पोलीस आयुक्तांची खात्री पटेल अशा रीतीने दर्शविण्यात येईल ते खेरीजकरून, अशी कोणतीही लायसने देता किंवा नवीन करून देता कामा नये.]

ज्या कारणांवरून लायसन नाकारता येईल किंवा रद्द करता येईल ती कारणे.

५. [२][ (१-क) पोलीस आयुक्तास जर त्याच्या मते असे वाहन सार्वजनिक वाहन म्हणून उपयोगात आणणे अयोग्य असेल तर, अशा वाहनांच्या कोणत्याही वर्गास लायसन मंजूर करण्यास नकार देण्याचा अधिकार आहे. तसेच, पोलीस आयुक्तास, त्याच कारणावरून, उक्त लायसन नवीन करून देण्यास नकार देण्याचा आणि अशा वाहनासाठी पूर्वी मंजूर केलेली लायसने रद्द करण्याचा अधिकार आहे. अशा रीतीने लायसन रद्द केल्यानंतर, लायसनदारास, त्याने लायसनसाठी दिलेल्या फीमधून लायसनच्या राहिलेल्या मुदतीबद्दल, लायसनच्या संपूर्ण मुदतीबद्दल त्याने दिलेल्या रकमेच्या प्रमाणात हिशेब करून, जी रक्कम देण्याजोगी असेल तेवढी रक्कम परत देण्यात आली पाहिजे.]

(१) पोलीस आयुक्तास, जर त्याच्या मते वाहन अपुरे असेल किंवा ज्या कारणासाठी त्याची योजना असेल त्या कारणासाठी अन्य रीत्या अयोग्य असेल तर, सार्वजनिक वाहनास लायसन मंजूर करण्यास नकार देण्याचा अधिकार आहे.

(२) पोलीस आयुक्तास उपरिनिर्दिष्ट कारणांपैकी कोणत्याही कारणांवरून किंवा जर त्याच्या मते--

(एक) लायसनदाराने या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचा किंवा या अधिनियमान्वये केलेल्या नियमाचा किंवा लायसनच्या शर्तीचा भंग केला असेल ; किंवा

---

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८६, कलम ३ (दोन) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम ४ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(दोन) माल नेण्यासाठी लायसन दिलेल्या वाहनाचा उपयोग उतारू वाहून नेण्यासाठी केलेला असेल;--

तर सार्वजनिक वाहनासाठी लायसन नवीन करून देण्यास नकार देण्याचा आणि कोणत्याही वेळी असे लायसन निलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकार आहे.

(३) सार्वजनिक वाहनांसाठी लायसन नवीन करून देण्यास नकार देताना किंवा ते निलंबित करताना किंवा ते रद्द करताना पोलीस आयुक्तास या अधिनियमाअन्वये त्यावर लिहिलेला मजकूर खोडून टाकण्याचा अधिकार आहे.

विवक्षित क्षेत्रांमध्ये सायकल-रिक्षांच्या संबंधात लायसन देण्यासंबंधी विशेष तरतुदी.

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९७९ चा महाराष्ट्र १३.

[1][ ५-क (१) कलमे ३, ४, ५ आणि ३६ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये रचना करण्यात आलेल्या नागपूर शहरात आणि कलम ३६ अन्वये, कलमे ३, ४ आणि ५ यांचा विस्तार जेथे होतो किंवा असा विस्तार करण्यात आला आहे असे क्षेत्र असणाऱ्या कलम ३६ अन्वये, आयुक्त, याबाबतीत वेळोवेळी, अधिसूचित करील अशा इतर क्षेत्रामध्ये, मुंबई सार्वजनिक वाहने (सुधारणा) अधिनियम, १९७९ याचा प्रारंभ झाल्यानंतर, अर्जदार हा--

(क) स्वत:च सायकल-रिक्षा चालक असेल ;

(ख) तो एकतर तिचा एकमेव मालक असेल आणि जर एकमेव मालक नसेल तर, तीनपेक्षा अधिक नाहीत अशा इतर चालकांबरोबर तिचा संयुक्त मालक असेल ; आणि

(ग) अशी सायकल-रिक्षा चालवण्यामुळे जे उत्पन मिळेल त्याशिवाय, त्याच्या निर्वाहास पुरेसे होईल असे दुसरे कोणतेही उत्पन त्याला नाही असे पोलीस आयुक्ताचे मत असेल,

त्याव्यतिरिक्त, कोणत्याही अर्जदाराला, कोणतीही सायकल-रिक्षा ठेवण्यासाठी किंवा ती भाड्याने देण्यासाठी, पोलीस आयुक्तांकडून कोणतेही लायसन देण्यात येणार नाही किंवा त्याचे नवीकरण करण्यात येणार नाही :

परंतु, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी जे विधिग्राह्य असेल अशा सायकल-रिक्षाच्या बाबतीतील कोणत्याही लायसनचे, जी चालक नाही अशा व्यक्तीच्या, किंवा जी चालक आहे अशा दुसऱ्या व्यक्तीसह, अशा व्यक्तीच्या नावाने, संयुक्तपणे, एका वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही अशा, मात्र, एकूण दोन वर्षांपेक्षा अधिक नाही अशा कालावधीसाठी, पोलीस आयुक्ताकडून, नवीकरण करता येईल :

आणखी असे की, अर्जदार हा अज्ञान किंवा विधवा असेल किंवा त्याच्यामध्ये कोणतीही शारीरिक किंवा मानसिक दुर्बलता असेल आणि पोलीस आयुक्ताच्या मते, अर्जदाराला, त्याच्या निर्वाहासाठी, अशी सायकल-रिक्षा भाड्याने देण्यापासून जे उत्पन्न प्राप्त होईल त्याखेरीज इतर कोणतेही उत्पन्न नसेल, अशा कोणत्याही बाबतीत, या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनासाठी.--

(अ) " सायकल-रिक्षा " याचा अर्थ, पायडलद्वारे चालवावयाची सायकल-रिक्षा असा आहे, मात्र, इंजिन बसविण्यात आलेल्या कोणत्याही सायकल-रिक्षाचा यात समावेश होणार नाही ;

(ब) " चालक " याचा अर्थ, जी स्वत: सायकल-रिक्षा चालवते आणि कलम ११ अन्वये त्या प्रयोजनासाठी देण्यात आलेले लायसन धारण करते अशी व्यक्ती असा आहे.

---

१. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये कलम ५ क समाविष्ट करण्यात आले.

(२) पोलीस आयुक्ताच्या, एखाद्या व्यक्तीच्या नावाने लायसन मंजूर करण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देणाऱ्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीने, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, राज्य शासनाकडे अर्ज केल्यावरून किंवा स्वत:हून कोणत्याही वेळी, राज्य शासनाला, पोलीस आयुक्ताने या कलमान्वये मंजूर केलेल्या कोणत्याही आदेशाचा कायदेशीरपणा व औचित्य याबाबत आपले समाधान करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, त्या प्रकरणाचे अभिलेख मागविता येतील आणि त्यांची तपासणी करता येईल आणि संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या संबंधात त्याला योग्य वाटतील असे आदेश देता येतील.]

वाहनांवर क्रमांक, वगैरे लिहिणे.

६. (१) सार्वजनिक वाहनासाठी लायसन मंजूर करताना किंवा आवश्यक असेल अशा इतर वेळी पोलीस आयुक्ताने, कलम ३ चे पोट-कलम २ चे खंड (अ) व (ब) अन्वये आवश्यक असलेला तपशील वाहनांवर रंगाने लिहून घेण्याची किंवा इतर रीतीने स्पष्टपणे लिहिण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) मागील कलमाअन्वये लिहिलेल्या कोणत्याही मजकुरासाठी, जेव्हा तो मजकूर लायसन मंजूर करण्याच्या वेळी किंवा लायसन दरवर्षी नवीन करून देण्याचे वेळी लिहिला असेल तेव्हा कोणतीही फी आकारता कामा नये ; परंतु, असा मजकूर इतर कोणत्याही वेळी लिहिला जाईल तेव्हा [1][ लायसनदाराने पोलीस आयुक्त नियमाद्वारे निदेश देईल अशी रक्कम, असा मजकूर लिहिण्याचा खर्च म्हणून दिली पाहिजे.]

सार्वजनिक वाहनांच्या लायसनबद्दल फी.

७. (१) सार्वजनिक वाहनासाठी लायसन मंजूर करण्यासाठी पोलीस आयुक्त विहित करील अशा दराने, फी आकारण्यात आली पाहिजे.

(२) असे लायसन नवीन करून देण्यासाठी, उपरिनिर्दिष्ट पोट-कलमान्वये आकारण्यात येईल अशा दराच्या निम्या दराने, फी आकारण्यात आली पाहिजे.

## घोड्यांचे लायसन

घोड्यांचे लायसन.

८. (१) सार्वजनिक वाहन ओढण्याच्या कारणासाठी कोणत्याही घोड्याच्या बाबतीत पोलीस आयुक्ताने लायसन मंजूर केले असल्याशिवाय अशा घोड्याचा उपयोग करता कामा नये.

(२) अशी लायसने या अधिनियमान्वये ती त्यांच्या मुदतीपूर्वी संपविण्यात आली नसतील तर, लायसनच्या वर्षअखेरपर्यंत अंमलात राहतील व त्याचे नवीकरण करता येईल.

(३) अशा लायसनमध्ये पुढील तपशील व पोलीस आयुक्त विहित करील असा इतर तपशील व शर्ती यांचा समावेश करण्यात आला पाहिजे :--

(क) लायसनदाराचे संपूर्ण नाव व पत्ता ;

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ७, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) ज्या दिनांकास लायसन मंजूर करण्यात आले तो दिनांक व ज्या दिनांकास तो संपतो तो दिनांक ;

(ग) ज्या स्थानिक क्षेत्रासाठी ते मंजूर करण्यात आले असेल ते स्थानिक क्षेत्र ;

(घ) ज्या घोड्याच्या बाबतीत लायसन मंजूर करण्यात आले असेल त्या घोड्याचे वर्णन व त्यास ओळखण्याच्या खुणा ;

(ङ) जे वाहन ओढण्यासाठी उक्त घोड्याचा उपयोग केला जाईल त्या वाहनाचा प्रकार.

(४) लायसनदारास अशी लायसने कोणत्याही व्यक्तीच्या नावे, पोलीस आयुक्ताच्या मंजुरीशिवाय, हस्तांतरित करता येणार नाहीत आणि जर ती अशा मंजुरीशिवाय हस्तांतरित करण्यात आली तर ती त्यानंतर रद्द होतील अशी मंजुरी लायसनवर लिहिली असली पाहिजे.

[1][ (५) अशी लायसने पोलीस आयुक्ताने तसा निदेश दिला असेल तर, जी ओढण्यासाठी घोड्याचा उपयोग करण्यात येतो अशा सार्वजनिक वाहनांमध्ये असली पाहिजेत आणि जेव्हा जेव्हा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास त्याची तपासणी करण्याची आवश्यकता भासेल तेव्हा तेव्हा ती सादर केली पाहिजेत.]

घोड्यांना डाग देणे.

९. घोड्यासाठी लायसन मंजूर करताना, पोलीस आयुक्तास [2][ जर त्यास तसे करणे आवश्यक वाटेल तर,] अशा घोड्याच्या खुरांवर, तो सहजरीत्या ओळखता येऊ शकेल अशा रीतीने डाग देण्याचा अधिकार आहे.

ज्या कारणावरून घोड्यासाठी लायसन नाकारण्यात किंवा रद्द करण्यात येईल ती कारणे आणि पशुवैद्यकीय व्यवसायीकडून त्याची तपासणी.

१०. (१) पोलीस आयुक्तास, जर त्याच्या मते असा घोडा कोणत्याही रीतीने सार्वजनिक वाहनांस निरुपयोगी असेल तर उक्त घोड्याचे लायसन मंजूर करण्यास किंवा ते नवीन करून देण्यास नकार देण्याचा अधिकार आहे आणि कोणत्याही वेळी असे लायसन निलंबित करण्याचा अधिकार आहे.

(२) लायसन देण्यात अशा रीतीने नकार देण्याच्या किंवा असे लायसन निलंबित करण्याच्या बाबतीत, यथास्थिती, घोड्याचा मालक किंवा लायसनदार यांस, अशा घोड्याची तपासणी शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या पशुवैद्यकीय व्यवसायीतर्फे करून घेण्याचा अधिकार आहे आणि जर अशा व्यवसायीच्या मते, असा घोडा सार्वजनिक वाहनांच्या उपयोगासाठी योग्य असेल तर पोलीस आयुक्ताने लायसन मंजूर केले पाहिजे किंवा ते नवीन करून दिले पाहिजे किंवा करण्याचा आदेश रद्द केला पाहिजे.

## ड्रायव्हरांना लायसन देणे

ड्रायव्हरांना लायसन देणे.

११. (१) कोणत्याही व्यक्तीने याबाबतीत पोलीस आयुक्ताने लायसन मंजूर केले असल्याशिवाय, सार्वजनिक वाहनाचा ड्रायव्हर म्हणून काम करता कामा नये.

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ४ अन्वये पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये “ करील ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) असे लायसन, त्याची मुदत संपण्यापूर्वी या अधिनियमान्वये ते संपविण्यात आला नसेल तर लायसनच्या वर्षअखेरपर्यंत अंमलात राहील आणि ते नवीन करून दिले जाऊ शकेल.

(३) अशा लायसनमध्ये पुढील तपशील व पोलीस आयुक्त विहित करील असा इतर तपशील व शर्ती यांचा समावेश करण्यात आला पाहिजे :--

(क) लायसनदाराचे संपूर्ण नाव व पत्ता ;

(ख) ज्या दिनांकास लायसन मंजूर करण्यात आले असेल तो दिनांक व ज्या दिनांकास ते संपते तो दिनांक ;

(ग) ज्या स्थानिक क्षेत्रासाठी ते मंजूर करण्यात आले ते स्थानिक क्षेत्र ;

(घ) जे सार्वजनिक वाहन चालविण्यासाठी लायसनदारास लायसन दिले असेल त्या सार्वजनिक वाहनाचा प्रकार.

ज्या कारणांवरून ड्रायव्हरचे लायसन नाकारण्यात किंवा रद्द करण्यात येईल ती कारणे.

१२. (१) पोलीस आयुक्तास, जर त्याच्या मते असा ड्रायव्हर [1][ लायक नसेल किंवा काळजी घेणारा नसेल किंवा ] पोरवयामुळे, दुर्बलतेमुळे, वाईट वर्तणुकीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सार्वजनिक वाहनाचा ड्रायव्हर म्हणून व्यवसाय करण्यास अयोग्य असेल तर, ड्रायव्हरचे लायसन नाकारण्याचा अधिकार आहे.

(२) पोलीस आयुक्तास, उपरिनिर्दिष्ट कारणांवरून किंवा जर धारण करणाऱ्याने या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचा किंवा या अधिनियमान्वये केलेल्या नियमाचा किंवा लायसनच्या शर्तींचा भंग केला असेल तर ड्रायव्हरचे लायसन नवीन करून देण्याचे नाकारण्याचा किंवा कोणत्याही वेळी ते निलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकार आहे.

ड्रायव्हरांचे बिल्ले.

१३. (१) ड्रायव्हरला लायसन मंजूर करताना, पोलीस आयुक्ताने, लायसनचा क्रमांक असलेला एक धातूचा बिल्ला त्यास दिला पाहिजे.

(२) असा बिल्ला मिळालेल्या प्रत्येक ड्रायव्हरने, उक्त बिल्ला, ड्रायव्हर म्हणून तो काम करीत असेल अशा सर्व वेळी, आपल्या पोषाखाच्या ठळक जागी लावला पाहिजे.

(३) असा बिल्ला मिळालेल्या कोणत्याही ड्रायव्हरने इतर कोणत्याही व्यक्तीस तो वापरू देता कामा नये : परंतु, ज्या ड्रायव्हरला पोलीस आयुक्ताने बिल्ला दिला आहे अशा ड्रायव्हर खेरीजकरून जी कोणतीही व्यक्ती असा बिल्ला वापरील ती व्यक्ती एतद्विरुद्ध सिद्ध केले जाणार नाही तोवर, अशा ड्रायव्हरच्या परवानगीने बिल्ला वापरीत आहे असे समजण्यात आले पाहिजे.

ड्रायव्हरांच्या लायसनबद्दल फी.

१४. (१) ड्रायव्हरला लायसन मंजूर करण्यासाठी, पोलीस आयुक्त विहित करील अशी फी आकारण्यात आली पाहिजे.

(२) असे लायसन नवीन करण्यासाठी, मागील पोट-कलमान्वये आकारण्यात येणाऱ्या दराच्या निम्म्या दराने, फी आकारण्यात आली पाहिजे.

---

१. सन १९२४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## लायसनसंबंधीच्या तरतुदी

१५. जे लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात आले आहे असे प्रत्येक लायसन, लायसनदाराने, ते निलंबित किंवा रद्द झाल्यापासून चोवीस तासांच्या आत, पोलीस आयुक्तांकडे परत केले पाहिजे.

लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात येईल तेव्हा ते परत करणे.

१६. जेव्हा जेव्हा लायसनदार आपले राहण्याचे ठिकाण बदलील तेव्हा तेव्हा त्याने त्यानंतर एक आठवड्याच्या आत, त्याबद्दल आपली सही असलेली एक लेखी नोटीस पोलीस आयुक्तास दिली पाहिजे.

लायसनदाराचा पत्ता बदलला असल्यास त्याबद्दलची माहिती देणे.

[1][ १६-क. सार्वजनिक वाहनाचा लायसनदार जेव्हा पंधरा दिवसांहून अधिक मुदतीसाठी [2][ बृहन्मुंबईत ] गैरहजर राहील तेव्हा, त्याने, जर सार्वजनिक वाहनाचा उपयोग, भाड्याने वाहन चालविण्याचा कारणासाठी होत असेल तर, आपण जाण्याच्या अगोदर, स्वत: सही केलेली त्याबाबतीतील एक लेखी नोटीस पोलीस आयुक्तास दिली पाहिजे. अशा नोटीशीत, सार्वजनिक वाहन ज्या व्यक्तीच्या ताब्यात राहील त्या व्यक्तीचे नाव निर्दिष्ट केले असले पाहिजे. अशा व्यक्तीने लायसनदार परत येईतोपर्यंत, सार्वजनिक वाहनाच्या लायसनदाराची सर्व कर्तव्ये बजाविली पाहिजेत आणि या अधिनियमान्वये असा लायसनदार ज्या शास्तीस पात्र ठरत असेल अशा सर्व शास्तीस पात्र ठरेल.]

लायसनदाराने, त्याच्या गैरहजेरीत वाहन ज्याच्या ताब्यात दिले असेल त्या व्यक्तीचे नाव कळविणे.

१७. सार्वजनिक वाहन किंवा घोडा त्याच्या प्रत्येक लायसनदाराने, जेव्हा पोलीस आयुक्त त्यास तसे करण्यास भाग पाडील तेव्हा, असे वाहन किंवा घोडा तपासणीसाठी हजर केले पाहिजे.

सार्वजनिक वाहन किंवा घोडा, जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा तपासणीसाठी हजर करणे.

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ६ अन्वये कलम १६-क समाविष्ट करण्यात आले.

२. १९४५ च्या मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९ व अनुसूची इ, तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २, परंतुका अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## भाडी व वाहनतळ

भाड्याचे दर. १८. पोलीस आयुक्ताने आगाऊ प्रसिद्धी देणे व [1][ [2][राज्य] शासनाची ] मंजुरी घेणे या शर्तीस अधीन राहून, सार्वजनिक वाहनासाठी भाड्याचे वैध दर ठरविले पाहिजेत.

वाहनतळ. १९. पोलीस आयुक्ताने, सार्वजनिक वाहनांनी भाड्याकरिता फिरण्यासाठी ज्या ठिकाणीच केवळ उभे असावे ते वाहनतळ किंवा त्या जागा नेमल्या पाहिजेत [3][ व त्यास, कोणत्याही वेळी, असे वाहनतळ किंवा जागा यांपैकी कोणताही वाहनतळ किंवा जागा काढून टाकण्याचा ] अधिकार आहे.

ड्रायव्हरजवळ ड्रायव्हर म्हणून त्याचे लायसन व भाड्याची यादी असणे. २०. (१) सार्वजनिक वाहनाच्या प्रत्येक ड्रायव्हरने, ड्रायव्हर म्हणून तो आपले काम करीत असेल तेव्हा, या अधिनियमाच्या कलम ११ अन्वये त्यास मंजूर केलेले लायसन आणि इंग्रजी भाषेतील आणि पोलीस आयुक्त विहित करील अशा देशी भाषेतील किंवा भाषांतील, स्पष्ट व वाचता येईल अशी एक यादी स्वत:जवळ ठेवली पाहिजे ; अशा यादीत, वाहनाच्या लायसनदाराचे संपूर्ण नाव आणि वाहनांच्या भाड्यासाठी त्या त्या वेळी ठरविलेल्या भाड्याचे दर आणि सार्वजनिक वाहनासंबंधी असलेल्या विधीचा गोषवारा या गोष्टी निर्दिष्ट केल्या पाहिजेत.

(२) अशा प्रत्येक ड्रायव्हरने, पोलीस अधिकाऱ्याने मागणी केल्यानंतर, तपासणीसाठी असे लायसन व यादी सादर केली पाहिजे.

(३) अशा प्रत्येक ड्रायव्हरने, वाहन भाड्याने घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा वाहनात प्रवास करणाऱ्या प्रवाशाने माहितीसाठी मागणी केल्यानंतर अशी यादी सादर केली पाहिजे.

भाड्याचे पुस्तक देणे. २१. सार्वजनिक वाहनासाठी त्या त्या वेळी ठरविलेल्या भाड्यांची यादी व मागील कलमांमध्ये उल्लेख केलेला गोषवारा ही पोलीस आयुक्ताने तयार केली पाहिजेत आणि जनतेस ती वाजवी किमतीस विकली पाहिजे.

## अपराध व शास्ती

लायसनशिवाय सार्वजनिक वाहन ठेवणे. २२. [4][ (१) ] जी कोणतीही व्यक्ती,--

(क) कोणतेही सार्वजनिक वाहन, याबाबतीत पोलीस आयुक्ताने मंजूर केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या लायसनशिवाय ठेवील किंवा भाड्याने देईल, किंवा

(ख) ज्या सार्वजनिक वाहनांवर कलम ३ अन्वये आवश्यक असलेला क्रमांक व इतर तपशील, पोलीस आयुक्त विहित करील अशा रीतीने स्पष्टपणे लिहिलेला नसेल असे कोणतेही सार्वजनिक वाहन [5]* * * ठेवील किंवा भाड्याने देईल, त्यास शंभर रुपये पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ७ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७, कलम २ द्वारे कलम २२ ला पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

५. सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९, कलम दोन, प्रथम अनुसूचीद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[१][ (२) जर कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१), खंड (क) अन्वये एखादा अपराध करील तर अशा अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या कोणत्याही न्यायालयास, ज्या वाहनाच्या संबंधात अपराध झाल्याची न्यायालयाची खात्री झाली असेल ते वाहन [२][ शासनाकडे ] सरकारजमा करण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार आहे.]

पोलिसाने फर्माविले असता सार्वजनिक वाहन चालविण्यात कसूर करणे.

२३. सार्वजनिक वाहनाचा जो कोणताही लायसनदार असे वाहन, पोलीस अधिकाऱ्याने त्यास चालविण्यास फर्माविले असता, पुरेशा कारणावाचून चालविण्यात कसूर करील त्यास आणि सार्वजनिक वाहनाचा जो कोणताही ड्रायव्हर, पोलीस अधिकाऱ्याने काम करण्यास फर्माविले असता, आपले काम करण्यात कसूर करील तर, त्यास पन्नास रुपयेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

सार्वजनिक वाहनाच्या लायसनदाराने, लायसन धारण न करणाऱ्या व्यक्तीस वाहन वापरण्यास देणे किंवा लायसन न दिलेल्या घोड्याकडून ते ओढले जाण्यास परवानगी देणे याबाबत.

२४. सार्वजनिक वाहनाचा जो कोणताही लायसनदार जेव्हा ते वाहन सार्वजनिक वाहन म्हणून वापरण्यात येत असेल तेव्हा, या अधिनियमान्वये योग्यरीत्या लायसन दिलेल्या ड्रायव्हर खेरीजकरून, उक्त वाहनाचा ड्रायव्हर म्हणून काम करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस परवानगी देईल तिला किंवा जी, जेव्हा असे वाहन उपरिनिर्दिष्ट कारणासाठी वापरण्यात येत असेल तेव्हा, उक्त वाहन, ज्या घोड्याच्या बाबतीतील या अधिनियमान्वयेचे लायसन अंमलात आहे असा घोडा खेरीजकरून, इतर घोड्याकडून ओढले जाण्यास परवानगी देईल त्यास पन्नास रुपयेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

सार्वजनिक वाहन किंवा घोडा तपासणीसाठी हजर करण्यात कसूर करणे.

२५. जो कोणी, सार्वजनिक वाहन किंवा घोडा याचा लायसनदार असून असे वाहन किंवा घोडा, पोलीस आयुक्ताने त्यास फर्माविले असता, तपासणीसाठी हजर करण्यात कसूर करील, तर तो, वीस रुपये पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

---

१. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७, कलम २ द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश; १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सार्वजनिक वाहनांच्या ड्रायव्हर्सचे अपराध.

२६. (१) जो कोणी, याबाबतीत पोलीस आयुक्ताने मंजूर केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या ड्रायव्हर्सच्या लायसनशिवाय किंवा [1][ जर त्यास पोलीस आयुक्तातर्फे बिल्ला मिळाला असेल तर अशा बिल्ल्याशिवाय सार्वजनिक वाहनाचा ड्रायव्हर म्हणून काम करील किंवा असा ड्रायव्हर म्हणून काम करीत असताना आपल्या पोषाखाच्या ठळक जागी बिल्ला लावण्यात कसूर करील ]; आणि

(२) जो कोणी, सार्वजनिक वाहनाचा ड्रायव्हर असून--

(क) त्याचे लायसन किंवा बिल्ला याचा उपयोग करण्यास इतर कोणत्याही व्यक्तीस परवानगी देईल ;

(ख) सार्वजनिक वाहनात जेवढे उतारू नेण्याबद्दल लायसन दिले असेल त्याहून अधिक उतारू उक्त वाहनातून नेण्यास परवानगी देईल ;

(ग) या अधिनियमान्वये सार्वजनिक वाहनावर लिहिलेला मजकूर लोकांना न दिसावा म्हणून तो लपविल किंवा लपवू देईल किंवा अशा मजकुराचे टिपण घेण्यास कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील ;

(घ) जे सार्वजनिक वाहन कोणत्याही व्यक्तीने भाड्याने घेतले असेल तेव्हा त्याच्या स्पष्ट संमतीवाचून उक्त वाहनात कोणत्याही व्यक्तीस नेऊ देण्यास परवानगी देईल ;

(ङ) पोलीस अधिकाऱ्याने मागणी केल्यावर [2][ कलम ८ किंवा कलम ११ ] अन्वये त्यास मंजूर केलेले [3][ जर असल्यास ] कोणतेही लायसन किंवा या अधिनियमान्वये आवश्यक असलेली भाड्याच्या वैध दराची यादी हजर करण्यात कसूर करील ;

(च) सार्वजनिक वाहन भाड्याने घेणाऱ्याने किंवा त्यातून प्रवास करणाऱ्या उतारूने मागणी केली असता या अधिनियमान्वये आवश्यक असलेली अशा वाहनाबाबत भाड्याच्या वैध दरांची यादी हजर करण्यास कसूर करील ;

(छ) कोणत्याही खाजगी वाहनास जर त्यास सुलभतेने मार्ग देता आला असताही मार्ग देणार नाही किंवा मार्ग देण्यात हयगय करील किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक वाहनाचा ड्रायव्हर अशा इतर वाहनात कोणत्याही व्यक्तीस घेत असेल किंवा वाहनातून उतरवीत असेल तर त्यास अडथळा निर्माण करील किंवा थांबवील ;

(ज) ड्रायव्हर म्हणून काम करीत असताना कोणत्याही वेळी मादक पदार्थ घेऊन धुंद होईल ;

(झ) उपमर्दकारक किंवा शिवीगाळीची भाषा किंवा हावभाव यांचा उपयोग करील ;

(ञ) जे सार्वजनिक वाहन त्याच्या ताब्यात असेल ते भाड्याने घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या वाजवी आदेशांचे पालन करण्यास नकार देईल ;

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ८ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमान्वये कलम ११ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ट) ड्रायव्हर म्हणून काम करीत असताना, जे सार्वजनिक वाहन त्याच्या ताब्यात असेल त्या वाहनात कचरा ठेवण्यास परवानगी देईल ; अथवा

(ठ) माल वाहून नेण्यासाठी उपयोगात येणाऱ्या गाडीखेरीजकरून सार्वजनिक वाहन ताब्यात असेल तेव्हा :--

(एक) त्याचे भाडे आधी मागील, अथवा

(दोन) वाहन भाड्याने घेण्याची इच्छा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस वाजवी कारणांशिवाय नेण्याचे नाकारील, अथवा

(तीन) वाजवी वेगाने जाण्यास नकार देईल किंवा उशीर लावील, अथवा

(चार) वाहनाचे भाडे म्हणून वैध भाड्यांपेक्षा अधिक भाडे मागील, अथवा

(पाच) या अधिनियमान्वये नेमलेल्या वाहनतळ किंवा जागा ह्या खेरीजकरून कोणत्याही जागी वाहने भाड्याने देण्यासाठी उभे राहील किंवा कोणतीही सार्वजनिक सडक, रस्ता किंवा जागा यात किंवा यावर भाड्याने वाहन घेतले जावे या कारणांसाठी भटकेल,

तो पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल.

२७. जो कोणताही लायसनदार,-- लायसन परत करण्यात किंवा पत्ता कळविण्यात कसूर करणे.

(क) जे निलंबित किंवा रद्द करण्यात आले आहे असे लायसन, ते निलंबित किंवा रद्द झाल्यापासून, चोवीस तासांच्या आत पोलीस आयुक्ताकडे परत देण्यात कसूर करील ; अथवा

(ख) जो, त्याचे राहण्याचे ठिकाण बदलल्यानंतर, अशा जागेत बदल केल्यानंतर एक आठवड्याच्या आत, स्वत: सही केलेली त्याबद्दलची लेखी नोटीस पोलीस आयुक्ताला देण्यात कसूर करील ; अथवा

[1][ (खख) जो, पंधरा दिवसांहून अधिक मुदतीपर्यंत [2][ बृहन्मुंबई सोडून ] जाण्यापूर्वी, त्याबद्दलची स्वत: सही केलेली लेखी नोटीस पोलीस आयुक्तास देण्यात कसूर करील ; अथवा ]

(ग) जो त्याच्या लायसनच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील,

त्यास वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

२८. सार्वजनिक वाहनाचा उपयोग करणारी जी कोणतीही व्यक्ती, जाणूनबुजून किंवा निष्काळजीपणामुळे, वाहनाचे नुकसान करील, त्यास वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य-दंडाची शिक्षा होईल आणि तसेच त्याने अशा वाहनाच्या मालकास, फौजदारी न्यायाधीश निदेश देईल अशी नुकसानभरपाई दिली पाहिजे व अशी नुकसानभरपाई दंड म्हणून आकारण्यात आली पाहिजे. सार्वजनिक वाहनास नुकसान पोहचविणे.

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ९ द्वारे खंड (खख) समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९ व अनुसूची इ, तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ च्या परंतुकाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नुकसान करणाऱ्या ड्रायव्हरने नुकसान-भरपाई देणे.

२९. जो निष्काळजीपणामुळे किंवा गैर चालीमुळे कोणतीही इजा किंवा नुकसान पोहचवील अशा कोणत्याही सार्वजनिक वाहनाच्या ड्रायव्हरने, विधीअन्वये तो ज्या कोणत्याही शिक्षेस पात्र असेल त्याशिवाय त्याने आणखी, फौजदारी न्यायाधीश निदेश देईल अशी वाजवी नुकसानभरपाई, फिर्यादीस दिली पाहिजे आणि अशी नुकसानभरपाई द्रव्यदंड म्हणून आकारण्यात आली पाहिजे.

## कार्यपद्धती

पोलिसांनी धरणे.

३०. कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, या अधिनियमान्वयेचा कोणताही अपराध ज्याने केला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस अधिपत्राशिवाय धरण्याचा अधिकार आहे.

विवादाच्या बाबतीतील कार्यपद्धती.

३१. (१) सार्वजनिक वाहन भाड्याने घेणारा व त्याचा ड्रायव्हर या दोघात कोणताही विवाद झाल्याचे बाबतीत त्या दोघांपैकी कोणाही एक पक्षकारास, दुसऱ्या पक्षकारास जवळच्या फौजदारी न्यायाधीशाचे न्यायालयात तत्काळ चालण्याबद्दल भाग पाडण्याचा अधिकार आहे व उक्त न्यायालयात त्यावेळी जो फौजदारी न्यायाधीश काम चालवित असेल त्याने उक्त वादाचा निकाल संक्षिप्त रीतीने चौकशी करून केला पाहिजे.

(२) जर त्यावेळी कोणताही फौजदारी न्यायाधीश काम चालवित नसेल तर, त्या दोघांपैकी कोणत्याही एका पक्षकाराने दुसऱ्या पक्षकारास [1][ जवळ जे पोलीस ठाणे असेल त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे ] येण्याबद्दल भाग पाडण्याचा अधिकार आहे, उक्त अधिकाऱ्याने, जर आवश्यक असेल तर, न्यायालयाच्या पुढील बैठकीत उक्त प्रकरणाची सुनावणी होण्यासाठी व्यवस्था केली पाहिजे.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये सांगितल्याप्रमाणे फौजदारी न्यायाधीशासमोर हजर होण्यात किंवा ज्या पुढच्या बैठकीपर्यंत ते प्रकरण स्थगित केले असेल अशा कोणत्याही बैठकीच्या वेळी हजर राहण्यात पक्षकारांपैकी कोणताही पक्षकार कसूर करील तर फौजदारी न्यायाधीशास उक्त प्रकरणाचा एकपक्षीय निर्णय देण्याचा अधिकार आहे आणि त्याचा निर्णय दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक असेल.

(४) परंतु, जर वाहन भाड्याने घेणारा [2][ बृहन्मुंबई ] सोडून जाणार असेल तर, पोट-कलम (२) मध्ये ज्या पोलीस अधिकाऱ्याकडे उल्लेख केलेला आहे त्यास, दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर भाड्याने घेणारा जी कोणतीही रक्कम त्याच्या मते देणे असेल, जर कोणतीही असल्यास, ती रक्कम आणि कलम २८ अन्वये कोणतीही नुकसानभरपाई त्याच्या मते देणे असेल तर दहा रुपयांची जादा रक्कम वाहन भाड्याने घेणाऱ्यास जमा करण्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे. आणि वाहन भाड्याने घेणाऱ्यास फौजदारी न्यायाधीशाच्या न्यायालयात, हजर राहण्याची आवश्यकता असणार नाही. पोलीस अधिकाऱ्याने तो खटला फौजदारी न्यायाधीशास कळविला पाहिजे आणि फौजदारी न्यायाधीशास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे वाहन भाड्याने घेणाऱ्याने जमा केलेल्या

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९ व अनुसूची इ, तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ च्या परंतुकाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

रकमेपेक्षा अधिक नाही अशी रक्कम, जर कोणतीही असल्यास, ड्रायव्हरला देण्याचा अधिकार आहे आणि जर कोणताही अपराध घडल्याचे आढळून येत असेल तर, विधीस अनुसरून त्याची चौकशी केली पाहिजे. दोन्ही बाबींपैकी कोणत्याही बाबतीत वाहन भाड्याने घेणाऱ्याने जमा केलेल्या रकमेतून काही रक्कम शिल्लक राहत असल्यास, फौजदारी न्यायाधीशाने वाहन भाड्याने घेणाऱ्यास त्याबद्दलची नोटीस दिली पाहिजे आणि त्याने मागणी केल्यानंतर ती रक्कम त्यास परत दिली पाहिजे.

(५) जेव्हा फौजदारी न्यायाधीशाची खात्री होईल की, एखाद्या पक्षकारास त्याच्या न्यायालयाकडे किंवा नजीकच्या पोलीस अधिकाऱ्याकडे दुसऱ्या पक्षकारास नेण्यास भाग पाडण्याचे वाजवी कारण नव्हते तर त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, पन्नास रुपयांहून अधिक नाही अशी नुकसानभरपाई पहिल्या पक्षकाराने दुसऱ्या पक्षकारास देण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार आहे आणि अशी नुकसानभरपाई द्रव्यदंड म्हणून आकारण्यात आली पाहिजे.

३२. (१) या अधिनियमान्वये सार्वजनिक वाहनाच्या ड्रायव्हरविरुद्ध फौजदारी न्यायाधीशासमोर तक्रार करण्यात येईल तेव्हा, फौजदारी न्यायाधीशास, जर ड्रायव्हर हजर राहण्यात कसूर करील तर, अशा वाहनांच्या लायसनदारास, तो हजर राहण्याबाबत आणि ड्रायव्हरला हजर करण्याबाबत समन्स काढण्याचा अधिकार आहे. लायसनदाराने ड्रायव्हरला हजर करणे.

(२) जर लायसनदार, योग्य रीतीने समन्स काढल्यानंतर, वाजवी सबबीवाचून हजर राहण्यात व ड्रायव्हरला हजर करण्यात कसूर करील तर, तो पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल. शास्ती.

३३. जिने सार्वजनिक वाहन भाड्याने घेतले आहे अशी कोणतीही व्यक्ती त्याबद्दलचे वैध भाडे देण्यास नकार देईल तर, फौजदारी न्यायाधीशास असे भाडे व तसेच वेळेच्या नुकसानीप्रीत्यर्थ वाजवी नुकसानभरपाई दण्याबद्दल आदेश देण्याचा अधिकार आहे ; असे भाडे व नुकसानभरपाई ही द्रव्यदंड म्हणून आकारण्यात आली पाहिजे. भाडे देण्यास नकार देणे.

## संकीर्ण

३४. (१) कोणत्याही सार्वजनिक वाहनात राहिलेली मालमत्ता ही, अशा वाहनाच्या लायसनदाराने किंवा ड्रायव्हरने जवळच्या पोलीस ठाण्यात ताबडतोब जमा केली पाहिजे. मालमत्तेची व्यवस्था.

(२) पोलीस आयुक्ताने अशी मालमत्ता, त्यावर ज्या व्यक्तीचा अधिकार आहे ती व्यक्ती पोलीस आयुक्ताची याप्रमाणे खात्री करून देईल तर, त्यास वाजवी रीत्या केलेला सर्व खर्च आणि पोलीस आयुक्तास योग्य वाटेल अशी नुकसानभरपाई सार्वजनिक ड्रायव्हरास दिल्यानंतर, अशी मालमत्ता परत करण्याची व्यवस्था केली पाहिजे. शास्ती.

(३) जो लायसनदार किंवा ड्रायव्हर, पोट-कलम (१) अन्वये जमा करणे आवश्यक असलेली कोणतीही मालमत्ता जमा करण्यास कसूर करील तो, पन्नास रुपयेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

नियम. ३५. [१][ (१) पोलीस आयुक्तास पुढील गोष्टींबाबत या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम करण्याचा अधिकार आहे ; असे नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील,--

(क) कलम ६, पोट-कलम (२) अन्वयेचा मजकूर लिहिण्याचा खर्च म्हणून द्यावयाची रक्कम ठरविणे ;

(ख) सार्वजनिक वाहनांचे नियमन करणे. ]

(२) असे नियम [२][ राजपत्रात ] प्रसिद्ध केले पाहिजेत.

[३][ (३) अशा नियमात, नियमाचे उल्लंघन केल्याबद्दल तीस रुपये पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य-दंडाची शिक्षा होईल अशी तरतूद करण्याचा अधिकार आहे.]

अधिनियमाची व्याप्ती. ३६. (१) [४][ आयुक्ताला,] [५]* * * * [२][ राजपत्रात ] अधिसूचना प्रसिद्ध करून तिच्याद्वारे, हा अधिनियम किंवा त्याची कोणतीही विशिष्ट तरतूद [६][ त्याच्या ] [७]* * * * अधिकारितेतील कोणत्याही क्षेत्रास, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून लागू करण्याचा अधिकार आहे.

(२) जेव्हा हा अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग अशा कोणत्याही क्षेत्रास लागू केला जाईल तेव्हा [४][ आयुक्ताने ] [८]* * *--

(क) [९][ पोलीस आयुक्ताची नेमणूक करण्यात आली नसेल त्याबाबतीत ] अधिसूचनेद्वारे या अधिनियमान्वये पोलीस आयुक्ताकडे सोपविलेली कामे पार पाडण्यासाठी कोणत्या तरी व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे; आणि

(ख) आयुक्ताला, अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विवक्षित फौजदारी न्यायाधीशाने किंवा विवक्षित वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशाने या अधिनियमान्वये क्षेत्राधिकार चालविले पाहिजेत असा निदेश देण्याचा अधिकार आहे,

[१०][ (ग) आयुक्ताला, अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वर्गाच्या वाहनांस या अधिनियमाच्या सर्व तरतुदीतून किंवा तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीतून माफी देण्याचा अधिकार आहे. ]

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ११ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

२. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ११ (ब) द्वारे पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

४. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३, अनुसूचीद्वारे " राज्य शासन " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, अनुसूचीद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

६. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३, अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, अनुसूचीद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

९. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६, कलम ३, अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

१०. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १२ (अ) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(३) हा अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही क्षेत्रास लागू करणारी या कलमान्वयेची अधिसूचना, ती अंमलात येण्यासाठी ठरविलेल्या दिनांकापूर्वी, कमीतकमी तीस दिवस आधी, प्रसिद्ध केली पाहिजे.

[१][ (३-क). जेव्हा हा अधिनियम किंवा त्याची कोणतीही विशिष्ट तरतूद कोणत्याही क्षेत्रास, या कलमान्वयेच्या अधिसूचनेद्वारे लागू करण्यात येईल तेव्हा, या अधिनियमाच्या मागील कलमात येणाऱ्या [२][ बृहन्मुंबई ] याचा अर्थ, हा अधिनियम किंवा त्याच्या कोणत्याही विशिष्ट तरतुदी अशा अधिसूचनेद्वारे ज्या क्षेत्रास लागू करण्यात आल्या असतील ते क्षेत्र, असा आहे.]

(४) जेव्हा हा अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही क्षेत्रास लागू करण्यात येईल तेव्हा, फी ठरविण्याचे, वाहनतळ नेमण्याचे किंवा ते [३][ काढून टाकण्याचे ] किंवा नियत करण्याचे अधिकार, [४][ आयुक्ताच्या ] पसंतीच्या अधीन राहून अंमलात आणले पाहिजेत.

[५]* * * * * * *

भाड्यासाठी घेऊन चालविण्याच्या कारणासाठी ज्या वाहनांचा उपयोग करण्यात येत नाही अशा वाहनास विवक्षित तरतूद लागू करण्याचा अधिकार.

[६][ ३७. [७][ [८][राज्य] शासनाला ] किंवा हा अधिनियम किंवा त्याच्या कोणत्याही विशिष्ट तरतुदी कलम ३६ अन्वये ज्या क्षेत्रास लागू करण्यात आल्या आहेत अशा कोणत्याही क्षेत्रात [४][ आयुक्ताच्या ] [९]* * * [१०][ राजपत्रात ] अधिसूचना प्रसिद्ध करून, तिच्याद्वारे भाड्याने घेऊन वाहने चालविण्यासंबंधी ज्या तरतुदी आहेत त्या खेरीजकरून या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी किंवा अशा कोणत्याही तरतुदींचा कोणताही भाग, जी वाहने भाड्याने देण्यासाठी ठेवली आहेत किंवा जी वाहने साधारणत: भाड्याने दिली जातात परंतु भाडे घेऊन चालविण्याच्या कारणांसाठी उपयोग करण्यात येत नाही अशा वाहनास किंवा वाहनांच्या कोणत्याही प्रकारास लागू करण्याचा अधिकार आहे. ]

**स्पष्टीकरण.--**जर कोणतेही वाहन, खाजगी करार करून केवळ कधी कधी भाड्याने देण्यात येत असेल तर ते वाहन भाड्यासाठी ठेवलेले वाहन आहे असे समजता कामा नये.

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १२ (ब) द्वारे पोट-कलम (३-क) समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९ व अनुसूची इ, तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २, परंतुकाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १२ (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३, अनुसूची अ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ द्वारे, १९२४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ च्या कलम २ द्वारे मूळ पोट-कलम (५) करिता दाखल करण्यात आलेले पोट-कलम (५) वगळण्यात आले.

६. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १३ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम ३७ दाखल करण्यात आले.

७. भारतीय विधि अनुकूलन परिषदेच्या आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९. सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, अनुसूचीद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

१०. भारतीय विधि अनुकूलन परिषदेच्या आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

वेळोवेळी अधिकार अंमलात आणणे.

३८. या अधिनियमान्वये दिलेले सर्व अधिकार, प्रसंगानुरूप, वेळोवेळी अंमलात आणण्याचा अधिकार आहे.

निरसन व व्यावृत्ती.

[१][ ३९. मुंबई सार्वजनिक वाहने (एकीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५८, याच्या प्रारंभानंतर, पुढील अधिनियम, म्हणजे-- १९५८ चा मुंबई ८६.

(एक) मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूलन व लागू केलेला मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२०, १९२० चा मुंबई ७.

(दोन) मुंबई राज्याच्या विदर्भ विभागात अंमलात असलेला भाड्याच्या गाड्यांबाबत अधिनियम, १८७९, १८७९ चा मुंबई १४.

(तीन) हैद्राबाद सार्वजनिक वाहने अधिनियम, १९५६ आणि १९५६ चा हैद्राबाद ३९.

(चार) मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२०, हे रद्द होतील : १९२० चा मुंबई ७.

परंतु, ते अशा रीतीने रद्द झाले तरीही.—

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कायद्यांच्या तरतुदीन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना, दिलेले लायसन किंवा केलेला नियम या अधिनियमान्वये सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याने किंवा असा कोणताही प्राधिकारी अस्तित्वात नसेल किंवा सक्षम प्राधिकारी कोण आहे याविषयी वाद असेल त्या बाबतीत, राज्य शासन नामनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्याने काढलेली कोणतीही अधिसूचना, दिलेले लायसन किंवा केलेला नियम याद्वारे रद्द करण्यात किंवा सुधारण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील ;

(ख) या अधिनियमानुसार केलेले कोणतेही कृत्य किंवा उपाययोजना, (त्यात दिलेली कोणतीही नोटीस, दाखल केलेले खटले, संपादन केलेला हक्क, प्राप्त झालेला बोजा व पत्करलेली जबाबदारी, लादलेला दंड, अनिर्णित असलेले कामकाज, दिलेले बिल्ले, ठरविलेले भाड्याचे दर, ठरविलेले वाहनतळ व जागा, किंवा दिलेली मंजुरी यांचा समावेश होतो) हा अधिनियम जणू त्यावेळी अंमलात असल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये केलेले कृत्य किंवा उपाययोजना आहे, असे समजले पाहिजे.]

---

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८६, कलम ३ (तीन) द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३०६९५
  ०२२-२३६३४०४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२५८०८
  ०२०-२६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५

- **सहायक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३४३३९६
  ०२४०-२३३१४६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५०४०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**